# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा
**{माहिती व तंत्रज्ञान विभाग}** प्रणाली प्रस्थापित करुन कार्यान्वीत करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्वपूर्ण असून अलिकडच्या काळात शाळेत शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने काही अनुचित घटना घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असल्यामुळे या बाबीची शासनस्तरावर गंभीर दखल घेण्यात आली आहे. विशेषकरुन शोलय विद्यार्थ्यांच्या म्हणजे मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे गरजेचे असल्यामुळे त्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने शाळा व परिसरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा हा उत्तम पर्याय आहे.

करिता मनपाच्या 82 शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा प्रणाली प्रस्थापित करण्यासाठी ई-निविदा प्रकिया राबविण्याकरीता शिक्षण विभाग पद क्रं. A28202030801 मधून रु. 2,70,00,000/- व पद क्रं. A45802073008 मधून रु. 10,68,548/- असे दोन्ही पद क्रं. मधून ऐकून रु. 2,80,68,548/- चे प्रावधान नोंदविण्यात आले आहे.

मा. अति. आयुक्त (सेवा), मनपा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीचे सदस्य उपायुक्त तथा संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, प्र.ले.वि.अ., लेखा व वित्त विभाग, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता, (इलेक्ट्रीकल), महाव्यवस्थापक (ई-गव्हर्नन्स), स्मार्ट सिटी, प्र. अधिकारी, नागरी सुविधा केंद्र यांनी दि. 19/06/2025 रोजी बैठक घेऊन प्राकलनास तांत्रिक मंजुरी प्रदान केली असून मा. आयुक्त, मनपा यांनी उपरोक्त कार्यास दि. 19.06.2025 रोजी मंजुरी दिली आहे.

सबब नागपूर महानगरपालिकेतील शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा प्रणाली प्रस्थापित करण्यासाठी येणाऱ्या एकूण रु. 2,80,68,548/- खर्चाच्या प्राकलनास मंजुरी प्रदान करुन ई-निविदा प्रक्रीया राबविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप:-** 1) हा खर्च शिक्षण विभाग पद क्रं. A28202030801 मधून 2,70,00,000/- व पद क्रं. A45802073008 मधून रु. 10,68,548/- असे दोन्ही पद क्रं. मधुन एकुण रु. 2,80,68,548/- खर्च प्रस्तावित आहे.

2) सविस्तर टिपणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 140/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 23/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२

अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा प्रणाली प्रस्थापित करुन कार्यान्वीत करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्वपूर्ण असून अलिकडच्या काळात शाळेत शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने काही अनुचित घटना घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असल्यामुळे या बाबीची शासनस्तरावर गंभीर दखल घेण्यात आली आहे. विशेषकरुन शोलय विद्यार्थ्यांच्या म्हणजे मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे गरजेचे असल्यामुळे त्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने शाळा व परिसरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा हा उत्तम पर्याय आहे.

करिता मनपाच्या 82 शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा प्रणाली प्रस्थापित करण्यासाठी ई-निविदा प्रकिया राबविण्याकरीता शिक्षण विभाग पद क्रं. A28202030801 मधून रु. 2,70,00,000/- व पद क्रं. A45802073008 मधून रु. 10,68,548/- असे दोन्ही पद क्रं. मधून ऐकून रु. 2,80,68,548/- चे प्रावधान नोंदविण्यात आले आहे.

मा. अति. आयुक्त (सेवा), मनपा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीचे सदस्य उपायुक्त तथा संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, प्र.ले.वि.अ., लेखा व वित्त विभाग, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता, (इलेक्ट्रीकल), महाव्यवस्थापक (ई-गव्हर्नन्स), स्मार्ट सिटी, प्र. अधिकारी, नागरी सुविधा केंद्र यांनी दि. 19/06/2025 रोजी बैठक घेऊन प्राकलनास तांत्रिक मंजुरी प्रदान केली असून मा. आयुक्त, मनपा यांनी उपरोक्त कार्यास दि. 19.06.2025 रोजी मंजुरी दिली आहे.

सबब नागपूर महानगरपालिकेतील शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा प्रणाली प्रस्थापित करण्यासाठी येणाऱ्या एकूण रु. 2,80,68,548/- खर्चाच्या प्राकलनास मंजुरी प्रदान करुन ई-निविदा प्रक्रीया राबविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.